बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक

आज़ादी का अमृत महोत्सव

**Corporate Communications & Investor Relations**
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn.

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्र नवीन प्रत्यक्ष कर संकलन प्रणाली ( टीण – २.० ) मध्ये सहभागी

पुणे ९ ऑक्टोबर २०२२ : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्या तांत्रिक सुविधा आयकर विभागाच्या नवीन प्रत्यक्ष कर संकलन प्रणालीशी ( टीण – २ ) एकीकृत केल्या आहेत. सध्याच्या काळात टीण – २ प्रणाली अंतर्गत प्रत्यक्ष कर संकलन सुविधा उपलब्ध होणारी बँक ऑफ महाराष्ट्र ही देशाच्या सार्वजनिक क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक आहे.

" तांत्रिक सुविधांच्या अशा एकत्रीकरणामुळे आणि नवीन मंच उपलब्ध झाल्यामुळे करदात्यांना करभरणा करणे तसेच आपली आयकर विवरणे इ – फाईल करणे त्यामुळे अधिक सुकर होणार आहे" असे बँक ऑफ महाराष्ट्रचे मुख्य कार्यकारी अधिकारी व् व्यवस्थापकीय संचालक श्री ए एस राजीव यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले. तसेच " यामुळे राष्ट्रीय इ –प्रशासन योजनेला अधिक चालना मिळून बँकेला महसुलाचे नवीन स्त्रोत निर्माण होतील व डिजिटल परिवर्तनाचा उपयोग करून ग्राहकांच्या सोयीनुसार सेवा देण्याच्या बँकेच्या प्रयत्नांना अधिक चालना मिळेल " असाही अभिप्राय श्री राजीव यांनी व्यक्त केला.

" बँक ऑफ महाराष्ट्र प्रत्यक्ष कर संकलन प्रणालीमध्ये प्रत्यक्ष सहभागी होत असून बँकेच्या सर्व शाखांमध्ये विविध माध्यमातून टीण – २ प्रणाली अंतर्गत प्रत्यक्ष कर संकलन सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे ग्राहकांना त्यांच्या सोयीने या सेवेचा लाभ घेता येईल "असे बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री आशिष पांडे यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले

भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या आयकर संचालनालय ( प्रणाली ) मधील अतिरिक्त संचालक , आयकर ( प्रणाली ) – २ ( ३ ) यांनी जारी केलेल्या दिशानिर्देशाचे अनुपालन करण्यासाठी सध्याच्या ऑनलाईन कर लेखा प्रणालीच्या ( ओल्तास ) प्रक्रियेत काही सुधारणा व बदलांच्या सह उपरोक्त प्रणाली सुरु झाली आहे.